पेट्रोलियम पदार्थांच्या खरेदी विक्रीतील गैरव्यवहारांना प्रतिबंध घालण्याकरीता सर्वसाधारण सूचना.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क.८१/नापु-२७
मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०५ जून, २०२६

संदर्भ:-

१. पेट्रोलियम अधिनियम, १९३४
२. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ पेट्रोलियम उत्पादने (उत्पादन, साठवणूक आणि पुरवठा यांचे नियमन) आदेश, १९९९
३. पेट्रालियम नियम, २००२
४. मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन अ‍ॅन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५
५. मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन अ‍ॅन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५ च्या अनुषंगाने शासनाचे दिनांक १९ जून, २००६ रोजीचे आदेश.
६. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २६/०५/२०२६ रोजीचे पत्र

## परिपत्रक

सद्यस्थितीमध्ये सुरु असलेल्या जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे वैश्विक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे, देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठयावर परिणाम झाला आहे.

सद्यस्थितीत राज्यामध्ये पेट्रोल/डिझेलचा साठा उपलब्ध आहे. तथापि, काही जिल्हयांमध्ये घाऊक औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल/डिझेल विक्री केंद्रावरून मोठ्या प्रमाणात डिझेल खरेदी केल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. घाऊक पेट्रोल/डिझेल विक्री दर हे किरकोळ पेट्रोल/डिझेल विक्री दरापेक्षा जास्त असल्याने घाऊक व औद्योगिक ग्राहक किरकोळ विक्री केंद्रावरून पेट्रोल/ डिझेल खरेदी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे किरकोळ ग्राहकांसाठी उपलब्ध इंधन साठ्यावर ताण येत आहे.

राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार मे २०२६ च्या पहिल्या तीन आठवड्यांत (१ मे २०२६ ते ३१ मे २०२६) मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत पेट्रोलच्या मागणीत १८.५४% तर डिझेलच्या मागणीत २२.३% वाढ नोंदविण्यात आली आहे. तसेच, बल्क डिझेलच्या विक्रीमध्ये लक्षणीय घट झाल्याचे देखील निदर्शनास आले आहे.

केंद्र शासनामार्फत राज्यामध्ये इंधनाचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्याचे व पेट्रोलियम उत्पादनांचे अनधिकृत मोठ्या प्रमाणातील खरेदी, साठेबाजी, काळाबाजार आणि गैरवापर रोखण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) पेट्रोलियम उत्पादने (उत्पादन, साठवणूक आणि पुरवठा यांचे नियमन )आदेश, १९९९ व मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन ॲन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५ नुसार पेट्रोलियम पदार्थांची अनधिकृत खरेदी, अनधिकृत विक्री इ. गैरप्रकार आहे.

२) राज्य शासनाच्या दिनांक १९ जून २००६ च्या आदेशान्वये मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन ॲन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५ च्या आदेशातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याकरीता पुढील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

i. सर्व विभागीय आयुक्त
ii. सर्व जिल्हयांचे जिल्हाधिकारी
iii. सर्व जिल्हयांचे अपर जिल्हाधिकारी
iv. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
v. सर्व उपायुक्त पुरवठा
vi. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
vii. सर्व उप विभागीय अधिकारी
viii. सर्व तहसिलदार
ix. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
x. सर्व अन्नधान्य सहायक वितरण अधिकारी
xi. सर्व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी

xii. सर्व उपनियंत्रक शिधावाटप

xiii. सर्व सहायक नियंत्रक शिधावाटप

xiv. पोलीस उप अधीक्षकापेक्षा कमी दर्जाचे नसलेले सर्व पोलीस अधिकारी

३) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, पेट्रोलियम अधिनियम, १९३४, पेट्रोलियम उत्पादने आदेश, १९९९, पेट्रोलियम नियम, २००२, मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन ॲन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५ आणि इतर लागू कायदे/नियमांच्या संबंधित तरतुदींनुसार पुढील अनियमिततेच्या अनुषंगाने तपासणी करुन कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

i. पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी आणि काळाबाजार

ii. किरकोळ ग्राहकांसाठी असलेल्या पेट्रोलियम पदार्थाचा अपहार

iii. किरकोळ दुकानांमधून पेट्रोलियम पदार्थाची अनधिकृत विक्री

iv. किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकरमध्ये/ बाउजरमध्ये अनधिकृतपणे इंधन भरणे

v. बॅरलमध्ये/ पिंपामध्ये वारंवार इंधन भरणे आणि संशयास्पद वाहने

vi. पेट्रोलियम उत्पादनांची असुरक्षित वाहतूक, अनधिकृत हाताळणी व अनधिकृत व वाजवीपेक्षा जास्त साठवणूक

vii. पेट्रोलियम पदार्थामध्ये भेसळ करणे, गळती करणे, अनधिकृत हस्तांतरण, नियमापेक्षा जास्त किंमत आकारणे, विहित केलेल्या मानकांपेक्षा कमी दर्जाचे पेट्रोलियम पदार्थ पुरवणे

४) आपल्या अधिकारक्षेत्रातील सर्व किरकोळ पेट्रोलियम पंपांच्या दैनंदिन विक्रीच्या माहितीवर देखरेख ठेवण्यात यावी. ज्या कोणत्याही किरकोळ विक्री केंद्रामध्ये पेट्रोलियम पदार्थांच्या विक्रीत अचानक आणि सांख्यिकीयदृष्ट्या असामान्य वाढ दिसून येईल, अशा केंद्राची तात्काळ तपासणी करण्यात यावी.

५) ज्या व्यावसायिक/औद्योगिक संस्थांना मोठया प्रमाणावर पेट्रोल/डिझेलची आवश्यकता असते, अशा संस्थांनी घाऊक (bulk) ग्राहक म्हणून थेट OMC कडून इंधन खरेदी करणे अपेक्षित आहे. अशा संस्थांना किरकोळ विक्री केंद्रावरुन पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा करण्यात येत नसल्याचे सुनिश्चित करावे.

तसेच, अशा संस्थांच्या मागणीमध्ये अचानक वाढ/घट निदर्शनास आल्यास तपासणी करण्यात यावी.

६) घाऊक ग्राहकांना (Bulk Consumers) पेट्रोल/डिझेलची आवश्यकता असल्यास संबंधित तेल विपणन कंपन्यांच्या Direct Sales / Bulk Supply यंत्रणेमार्फतच इंधन खरेदी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

७) घाऊक ग्राहक जर किरकोळ विक्री केंद्रावरून पेट्रोलियम पदार्थ खरेदी करीत असल्याचे आढळल्यास संबंधित घाऊक ग्राहकावर व किरकोळ विक्री केंद्र चालकावर जीवनावश्यक वस्तू अधिनियमातील कलमानुसार कारवाई करावी.

८) वैध पावत्या, डिलिव्हरी चलन आणि स्फोटक सुरक्षा प्रमाणपत्रांशिवाय पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करणाऱ्या अनधिकृत टँकर्स/बाउजर/वाहने यांची काटेकोरपणे तपासणी करुन नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

९) कृषी कार्यांसाठी तसेच रुग्णालयांसाठी डिझेलचा पुरवठा, प्रत्यक्ष गरजेनुसार आणि योग्य पडताळणीच्या अधीन राहून, कोणत्याही अडथळ्याविना सुनिश्चित करण्यात यावा.

१०) मासेमारी करणाऱ्या नौकांना मोठया प्रमाणावर डिझेलची आवश्यकता असते. मासेमारी सहकारी संस्था व मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडे नोंदणीकृत नौकांना आवश्यकतेनुसार डिझेलचा पुरवठा करण्यात यावा.

११) जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फत किरकोळ विक्री केंद्रावरून घाऊक ग्राहकांना पेट्रोल/डिझेल चा पुरवठा करण्याबाबत कोणतेही आदेश निर्गमित करण्यात येऊ नयेत.

१२) जिथे आवश्यक असेल तिथे किरकोळ विक्री केंद्रांवर रांगेचे नियमन, गर्दीचे व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक प्रशासकीय आणि पोलीस साहाय्य पुरवण्यात यावे.

१३) राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा उपलब्ध असून, नागरिकांनी अफवांमूळे भीतीपोटी इंधनाची खरेदी, साठेबाजी करण्याची आवश्यकता नाही, अशी माहिती स्थानिक प्रशासन आणि प्रसारमाध्यमांमार्फत नागरिकांना वेळोवेळी कळविण्यात यावी.

१४) नियमित पुरवठा साखळ्यांमधील कोणतीही विसंगती तसेच स्थानिक किरकोळ विक्री केंद्रावरील मागणीतील अचानक वाढ ओळखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने

इंडियन ऑइल (आयओसीएल), भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपीसीएल) यांच्या जिल्हास्तरीय समन्वयकांशी समन्वय साधावा व कारवाई करावी.

१५) उपरोक्त सूचनांनुसार करण्यात आलेल्या तपासण्या, जप्त केलेले टँकर/वाहने आणि दोषी विक्रेत्यांवर केलेल्या कारवाईचा तपशील सोबत जोडलेल्या गुगल शीट मध्ये दररोज सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्यात यावा. (https://docs.google.com/spreadsheets/d/१m४xTI१J१fDftOPA०MD-UHEoxtWs४IFlmaOedOOVQfrM/edit?usp=sharing)

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक२०२६०६०५१८२००९९३०६ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.06.05 18:24:40 +05'30'

**( अशोक आत्राम )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
७. सचिव (अनापुवग्रासं), मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव/महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व पोलीस आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी

१३.सर्व पोलीस अधिक्षक

१४.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई

१५.सर्व विभागीय आयुक्त

१६.सर्व उपायुक्त पुरवठा

१७.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी

१८.सर्व उप विभागीय अधिकारी

१९.सर्व तहसिलदार

२०.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

२१. सर्व अन्नधान्य सहायक वितरण अधिकारी

२२.सर्व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी

२३.सर्व उपनियंत्रक शिधावाटप

२४.सर्व सहायक नियंत्रक शिधावाटप

२५.पोलीस उप अधीक्षकापेक्षा कमी दर्जाचे नसलेले सर्व पोलीस अधिकारी

२६.राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई.

२७.निवडनस्ती (नापु-२७)